प्रकरण पाचवे

वाळवा तालुका कारागिर विकास (वि.का.स.)

ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - अनुवाने

व इतर योजना

प्रकरण पाचवे

वाळवा तालुका कारागिर विकास (वि.का.स.) ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - अनुदाने व इतर योजना

५.१ प्रस्तावना

५.२ अनुदाने

५.३ संघास मिळालेली अनुदाने
(१९७९-८० ते १९९१-९२)

अ) स्कात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम व जिल्हा ग्रामीण विकास संस्था व अनुदाने
ब) व्याज उपदान योजना व अनुदाने
क) विशेष घटक योजना व अनुदाने
ड) सेवा शुल्क आणि अनुदान

५.४ इतर योजना

अ) सरकारी शेअर्स
ब) माग मांडवल मदत व संघ
क) कर्जमाफी योजना

५.५ मूल्यमापन

प्रकरण पाचवे

वाळवा तालुका कारागिर विकास (वि.का.स.) ग्रामोद्योग संघ, मर्यादित, इस्लामपूर - अनुदाने व इतर योजना

५.१ प्रस्तावना :

या प्रकरणात संघास मिळणाऱ्या अनुदानांचा व इतर योजनांचा आढावा घेतला आहे. संघास मिळणारी अनुदाने व साहाय्यक इतर योजना कोणत्या आहेत, ही अनुदाने प्रत्येक वर्षी किती प्रमाणात मिळालेली आहेत, संघास मिळालेल्या या अनुदानांचा प्रत्येक वर्षानुसार आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचप्रमाणे ही वेगवेगळी अनुदाने कोणत्या संस्थाकडून व योजनेअंतर्गत आणि इतर योजनांच्या साहाय्याने मिळालेली आहेत त्याचा तपशीलवार आढावा घेतला आहे. संघास मिळालेली अनुदाने व योजना आणि इतर योजना म्हणजे एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, जिल्हा ग्रामीण विकास संस्था, व्याज उपदान योजना, विशेष घटक योजना, सेवा शुल्क, सरकारी माग, माग मांडवल मदत, कर्जमाफी योजना या आहेत. त्यांचा तपशील पुढीलप्रमाणे विशद केला आहे.

५.२ अनुदाने :

संघास आर्थिक अडचणींवर मात करता यावी म्हणजेच पर्यायाने कारागिरांच्या आर्थिक उन्नतीकरिता जी मदत मिळते त्यास अनुदाने असे म्हणतात. संघास पुढील संस्था व योजना मार्फत अनुदान मिळते.

१) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम (आय.आर.डी.पी.)

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांसाठी ग्रामीण भागात ही योजना कार्यरत असून या योजने अंतर्गत ग्रामोद्योग सुरू करणाऱ्या १८ ते ४० वयोगटातील कारागिरांना वित्तीय संस्थामार्फत मदत पुरविली जाते. ही योजना भारत

भारत सरकारच्या नियंत्रणाखाली कार्यरत असून १९८०-८१ या वर्षापासून संघास या योजनेअंतर्गत मदत मिळाली आहे. ग्रामीण भागातील कारागिरांनी घेतलेल्या कर्जावर ३३ टक्के अनुदान संघास मिळते. हे अनुदान जास्तीतजास्त कारागिरांच्या दृष्टीकोणातून ५,००० रुपयापर्यन्त मिळते. त्याच बरोबर कर्जदार सभासदांना ४ टक्के व्याजावर सवलत मिळते.

२) जिल्हा ग्रामीण विकास संस्था
(डी.आर.डी.ए.)

ही संस्था आय.आर.डी.पी. प्रमाणेच ग्रामीण भागातील कारागिरांसाठी कार्य करीत आहे. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना मदत करणे हा या संस्थेच्या स्थापनेमागील उद्देश आहे. याही संस्थेकडून कर्जदार सभासदांना ४ टक्के व्याजावर सवलत मिळते.

३) व्याज उपदान योजना :

संघातून कारागिरांना जे कर्ज वाटप केलेलेअसते त्या कर्जावरील व्याजात जी सवलत मिळते त्यास व्याज उपदान असे म्हणतात. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकाकडून कारागिरांना कॅश क्रेडीटच्या रुपाने दिलेल्या आर्थिक सहाय्यावरील व्याजासाठी बँकाचा व्याज दर १२.५ टक्के आणि ४ टक्के यामधील फरकाची रक्कम खादी व ग्रामोद्योग मंडळाकडून व्याज उपदान म्हणून देण्यात येते. सदर व्याज उपदान योजनेमुळे कारागिराला बँक कर्जावर प्रत्यक्ष व्याजाचा दर ४ टक्के आकारला जातो.

४) सेवा शुल्क :

संघाच्या कर्जदार सभासदांपैकी जे सभासद अनुसुचीत जाती, जमाती-मधील आहेत त्यांना ९ टक्के दराने रक्कम घेऊन ११ टक्के दराने दिली जाते. म्हणजेच २ टक्के हे सेवा शुल्क होय. सेवा शुल्काची रक्कम मंडळाकडून संघास मिळते. कारागिरांना सेवा उपलब्ध करून दिल्याबद्दल बलुतेदार सोसायटया कर्ज रकमेवर २ टक्के सेवा शुल्क आकारते.

५) कर्जमाफी योजना :

आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातून कर्जदार सभासदांची थकबाकी प्रमाण वाढत गेल्यास या योजनेची अंमलबजावणी केली जाते. महाराष्ट्र शासन कृषी व ग्रामीण कर्जमाफी योजना १९८९ प्रमाणे संघास २-१०-१९८९ रोजी या योजनेचा लाभ मिळाला आहे. या योजनेतून व्याजापोटी व मुदलापोटी रक्कम विभागून मिळते.

६)सरकारी माग :

संघाच्या कार्यात आर्थिक मदत व्हावी म्हणून संघातून विक्रीस निघालेले माग सरकार खरेदी करते. संघास ही एकप्रकारची मदतच आहे मात्र हे माग परत करावे लागतात.

७) माग मांडवल मदत :

संघास त्याच्या मागानुसार खादी ग्रामोद्योग मंडळाकडून माग मांडवल मदत मिळते. या मदतीमुळे संघाची आर्थिक कुवत वाढते. संघास ही मदत १९८४-८५ या वर्षापासून मिळालेली आहे.

८) विशेष घटक योजना :

१९८०-८१ या शासनाच्या योजनेच्या अंमलबदावणीत मंडळ सहभागी झाले आहे. या योजनेतून ग्रामोद्योग करणाऱ्या अनुसूचीत जाती, जमातीतील कारागिरांना उद्योगाचे स्वरूप पाहून जास्तीतजास्त रु. ५०००-०० पर्यन्त (कर्ज रकमेच्या ५० टक्के) अनुदान म्हणून दिले जाते.

संघास मिळणाऱ्या अनुदानांचा व इतर योजनांचा परामर्श वर्षानुसार तक्ता क्रमांक ५.१ मध्ये घेतला आहे. त्यामध्ये प्रत्येक योजना किंवा संस्थाकडून संघास १३ वर्षांच्या काळात एकूण मिळालेल्या अनुदानाचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. तक्ता क्रमांक ५.१ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

तक्ता क्रमांक ५.१

५.३ १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील संघास मिळालेली अनुदाने :

(आकडे रुपयात)

वर्ष	आय.आर. डी.पी.व डी.आर. डी.ए.	व्याज उपदाना-पोटी मिळालेली रक्कम	खादी ग्रामोद्योग मंडळाकडून विशेष घटक योजना अनुदान	सेवा शुल्क	एकूण
(१-६ ते ३०-६)					
१९७९-८०	-	३४,८६०	-	-	३४,८६०
१९८०-८१	५४,६००	-	-	-	५४,६००
१९८१-८२	४७,५७६	२६,७९०	-	५,७००	८०,०६६
१९८२-८३	४,८५५	-	-	-	४,८५५
१९८३-८४	४,७८७	१४,९६३	-	९८९	२०,७३९
१९८४-८५	-	-	३६,९७५	५१०	३७,४८५
१९८५-८६	-	३,०७७	४२,५५०	२,३२०	४७,९४७
१९८६-८७	-	२५,०४६	६२,०००	-	८७,०४६
१९८७-८८	-	१०,५००	५४,२००	१,३००	६६,०००
१९८८-८९	-	-	४५,०००	-	४५,०००
१९८९-९०	-	६,३९८	१,२२,२५०	४,२९०	१,३२,९३८
१९९०-९१	-	-	८५,०००	३,४२९	८८,४२९
१९९१-९२	-	९,००३	१,२१,२५०	५,१०४	१,३५,३५७
एकूण :	१,११,८१८	१,३०,६३७	५,६९,२२५	२३,६४२	८,३५,३२२

(आधार : कार्यालयीन कागदपत्रे)

तक्ता क्रमांक ५.१ चे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे केले आहे.

<u>संघाला मिळालेली अनुदाने</u> -

१) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील योजनानुसार एकूण अनुदानाची रचना पाहिल्यास सर्वात जास्त अनुदान खादी ग्रामोद्योग मंडळा-कडून विशेष घटक योजना अंतर्गत मिळाले असून ते रु. ५,६९,२२५-०० आहे तर सर्वात कमी अनुदान सेवा शुल्क योजना अंतर्गत असून ते रु. २३,६४२ आहे.

२) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील योजनानुसार अनुदानाची प्रत्येक वर्षाप्रमाणे रचना पाहिल्यास सर्वात जास्त अनुदान रु.१,२२,२५० असून ते १९८९-९० या वर्षामध्ये असून ते खादी ग्रामोद्योग मंडळाच्या विशेष घटक योजनेअंतर्गत मिळाले आहे. कमीतकमी अनुदान रु. ५१०-०० असून ते १९८४-८५ या वर्षातील सेवा शुल्क योजना अंतर्गत आहे.

३) १९७९-८० ते ९१-९२ या काळातील योजनानुसार अनुदानाची रचना पाहिल्यास खादी ग्रामोद्योग मंडळाच्या विशेष घटक योजना अंतर्गत अनुदानाचा प्रथम क्रमांक तर त्या पाठोपाठ व्याज उपदान योजना आय.आर. डी.पी. व डी.आर.ई. व सेवा शुल्कचा अनुक्रमे दुसरा, तिसरा व चौथा क्रमांक लागतो.

४) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील एकूण अनुदानाची रचना पाहिल्यास सर्वात जास्त अनुदान १९९१-९२ या काळात असून ते रु.१,३५,३५७ आहे. तर सर्वात कमी अनुदाने हे १९८२-८३ या वर्षात असून ते रु.४,२५५-०० आहे.

५) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील एकूण अनुदानाची रचना पाहिल्यास सरासरी अनुदान रु. ६४,२५६ इतके आहे.

अनुदाने व योजना :

योजनेनुसार अनुदानाची वैशिष्टये पुढीलप्रमाणे :

अ) स्वात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम व जिल्हा ग्रामीण विकास संस्था व अनुदाने.

१) या योजनाअंतर्गत अनुदानाची सुरुवात १९८०-८१ मध्ये झाली तर १९८३-८४ नंतर ही योजना स्थगीत करण्यात आली. मात्र १९८६-८७ मध्ये या योजनाकडून कर्जदार सभासदांना रु. ७६,९०२ वाटप करण्यात आले.

२) या योजना अंतर्गत संघास सर्वात जास्त अनुदान सन १९८०-८१ मध्ये रु. ५४,६०० मिळाले तर कमीतकमी अनुदान रु. १९८३-८४ मध्ये रु. ४,७८७ मिळाले.

३) या योजनाकडून मिळालेल्या अनुदानाची सरासरी पाहिल्यास ती रु. २७,९५५-०० इतकी आहे.

ब) व्याज उपदान योजना व अनुदान :

१) १९७९-८० ते १९९१-९२ या काळात या योजनेकडून संघास मिळालेले अनुदानाचे स्वरुप संदीत स्वरुपाचे असून एकूण अनुदान रु. १,३०,६३७-०० मिळाले आहे.

२) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील व्याज उपदानापोटी मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त अनुदान १९७९-८० या वर्षामध्ये असून ते रु. ३४,८६०-०० आहे तर कमीतकमी अनुदान १९८५-८६ या वर्षात असून ते रु. ३,०७७ इतके आहे.

३) १९७९-८० ते १९९१-९२ या काळातील संघास व्याज उपदानापोटी मिळालेले सरासरी अनुदान रु. १६,३३०-०० इतके आहे.

क) विशेष घटक योजना व अनुदान :

१) संस्थास या योजने अंतर्गत मिळालेले अनुदान खादी ग्रामोद्योग मंडळाकडून मिळते हे अनुदान १९८४-८५ पासून मिळण्यास सुरुवात झाली असून १९९१-९२ पर्यन्त रु. ५,६९,२२५-०० अनुदान मिळाले.

२) संस्थास या योजने अंतर्गत जास्तीतजास्त अनुदान १९८९-९० या वर्षात मिळाले असून ते रु. १,२२,२५०-०० आहे तर कमीतकमी अनुदान रु.३६,९७५-०० आहे हे अनुदान १९८४-८५ या वर्षातील आहे.

३) या योजने अंतर्गत मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास सरासरी अनुदान रु. ७१,१५३-०० आहे.

ड) सेवा शुल्क आणि अनुदान :

१) या योजने अंतर्गत संस्थास मिळालेले अनुदान खंडीत स्वरुपाचे असून १९९१-९२ पर्यन्त रु. २३,६४२-०० रुपये इतके अनुदान मिळाले आहे.

२) संस्थास या योजने अंतर्गत मिळालेले अनुदान पाहिल्यास जास्तीत-जास्त अनुदान १९८१-८२ या वर्षात असून ते रु. ५,०००-०० आहे तर कमीतकमी अनुदान हे रु. ५१०-०० आहे. हे अनुदान १९८४-८५ या वर्षातील आहे.

३) या योजने अंतर्गत संस्थास मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास सरासरी अनुदान रु. २,९५५-०० इतके येते.

५.४ इतर योजना व संघ :

संस्थास मिळालेल्या अनुदानाचा विचार करताना ज्या इतर योजना आहेत त्यांचा आढावा येथे घेतला असून त्या योजना म्हणजे सरकारी शेअर्स, माग मांडवल मदत, कर्जमाफी योजना या आहेत.



आलेख क्र.-२

अ) सरकारी शेअर्स :

संघास सरकारी मागापासून मिळालेल्या अनुदानाचे विश्लेषण तक्ता क्रमांक ५.२ मध्ये केले आहे तो खालीलप्रमाणे दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.२

सरकारी शेअर्सपासून संघास मिळालेले अनुदान
(१९७२-७३ ते १९९१-९२)

(आकडे रुपयात)

वर्ष	सरकारी माग
१९७२-७३	७,३३१
१९७३-७४	३६,९००
१९७४-७५	८००
१९७५-७६	-
१९७६-७७	१३,४००
१९७७-७८	३५,७७०
१९७८-७९	३५,४००
१९७९-८०	१३,४२०
१९८०-८१	१२,६६०
१९८१-८२	१६,८००
१९८२-८३	५,५००
१९८३-८४	२१,७८०
१९८४-८५	६,३८०
१९८५-८६	८,८००
१९८६-८७	-

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

तक्ता क्रमांक ५.२ (पुढे चालू...)

वर्ष	सरकारी भाग
१९८७-८८	१०,०००
१९८८-८९	८,०००
१९८९-९०	१०,०००
१९९०-९१	१०,०००
१९९१-९२	१०,०००
एकूण :	२,६२,९४१

(आधार : कार्यालयीन कागदपत्रे)

तक्ता क्रमांक ५.२ ची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळात संघास सरकारी शेअर्स पासून मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास सन १९७५-७६ व १९८६-८७ या दोन वर्षी अनुदान मिळालेली नाही.

२) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळात संघास सरकारी शेअर्सपासून जास्तीतजास्त अनुदान रु. ३६,९००-०० असून ते १९७३-७४ या वर्षातील आहे तर कमीतकमी अनुदान १९७४-७५ या वर्षी असून ते फक्त रु. ८००-०० आहे.

३) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील सरकारी शेअर्स (भाग) पासून संघास मिळालेले अनुदान पाहिल्यास सरासरी अनुदान रु.१४,६०८ इतके आहे.

ब) माग मांडवल मदत व संघ :

खादी ग्रामोद्योग मंडळाकडून संघास माग मांडवल मदत म्हणून जे अनुदान मिळालेले आहे त्याचे स्पष्टीकरण तक्ता क्रमांक ५.३ वरून होते. तक्ता क्रमांक ५.३ खाली दिला आहे.

तक्ता क्रमांक ५.३

माग मांडवलापासून संघास मिळालेले अनुदान
(१९८३-८४ ते १९८८-८९)

(आकडे रुपयात)

वर्ष	सभासद संख्या	माग मांडवल मदत
१९८३-८४	१४९	८,१९५
१९८४-८५	१४२	७,८१०
१९८५-८६	४७	२,५८५
१९८६-८७	३०	२१,८९०
१९८७-८८	२३	१,२६५
१९८८-८९	२७	४,२३५
एकूण :	४१८	४५,९८०

(आधार : कार्यालयीन कागदपत्रे)

तक्ता क्रमांक ५.३ ची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत :

१) संघास खादी ग्रामोद्योग मंडळाकडून जी माग मांडवल मदत मिळाली आहे तिची रचना पाहिल्यास एकूण ४१८ सभासदांना त्याचा लाभ मिळावा असून ती रक्कम रु. ४५,९८० इतकी आहे.

२) सभासद संख्या जास्तीतजास्त १९८३-८४ या वर्षी असून त्यांना रु. ८,१९५-०० मदत मिळाली आहे तर कमीतकमी सभासद संख्या १९८७-८८ या वर्षी असून ती २३ इतकी आहे तर त्यांना माग मॉडेल रु. १,२६५-०० मिळाली आहे.

३) १९८३-८४ ते १९८८-८९ या काळातील माग मॉडेल मदत पाहिल्यास जास्तीतजास्त मदत रु. २१,८९०-०० असून ती १९८६-८६ या वर्षातील आहे. मात्र त्याचा लाभ फक्त ३० सभासदांना झाला आहे. १९८७-८८ या वर्षातील मदत कमीतकमी असून ती रु. १,२६५-०० असून त्याचा लाभ २३ सभासदांना झाला आहे.

४) माग मॉडेल मदतीच्या अनुदानातील सभासद संख्येचा विचार केल्यास सरासरी सभासद संख्या ७० इतकी येते.

५) १९८३-८४ ते १९८८-८९ या काळातील माग मॉडेल मदतीच्या अनुदानाचा विचार केल्यास सरासरी मदत रु. ७,६६३-०० इतकी येते.

क) <u>कर्जमाफी योजना</u> :

१९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील संघाचा अभ्यास करताना संघास दि. २-१०-१९८९ या महात्मा गांधी जयंती दिवशी महाराष्ट्र शासन कृषी व ग्रामीण कर्जमाफी योजना १९८९ नुसार व्याजापोटी रु. ८९,१८३-०० आणि मुद्दलपोटी रु. २,८७,५४९-०० असे एकूण रु. ३,७६,७३२-०० कर्ज माफ झाले. त्याचा उद्योगाप्रमाणे व सभासद संख्येप्रमाणे खुलासा तक्ता क्रमांक ५.४ मध्ये केला आहे. तक्ता क्रमांक ५.४ पुढीलप्रमाणे दिला आहे :

तक्ता क्र. ५.४

संघास मिळालेली कर्ज माफी
(२-१०-१९८९)

(आकडे रुपयात)

उद्योगाचे नाव	सभासद संख्या	एकूण कर्ज माफी
चर्मोद्योग	८६	९५,२८०
कुंभार उद्योग	५६	१,४७,१३२
सुतार-लोहार उद्योग	४६	५०,९०२
वाख उद्योग	१८१	७४,०७८
वेत व बांबू उद्योग	२३	७,५७२
इतर उद्योग	५	१,७६८
एकूण :	३९७	३,७६,७३२

(आधार : कार्यालयीन कागदपत्रे)

तक्ता क्रमांक ५.४ चे स्पष्टीकरण पुढीलप्रमाणे विशद केले आहे.

१) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानाची रचना पाहिल्यास एकूण कर्जमाफी रु. ३,७६,७३२ असून त्याचा लाभ ३९७ कर्जदार सभासदांना मिळाला आहे.

२) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानात कुंभार उद्योगास सर्वात जास्त कर्जमाफीचा फायदा मिळाला असून या उद्योगास एकूण रु. १,४७,१३२ कर्जमाफी झाली असून त्याचा लाभ ५६ सभासदांना मिळाला आहे.

३) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानात कर्मयोगाचा दुसरा क्रमांक असून या उद्योगास रु. ९५,२८० रुपये कर्जमाफीचा लाभ झाला असून तो ८६ सभासदांना मिळाला आहे.

४) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानात वाख उद्योगाचा तिसरा क्रमांक असून या उद्योगास १८१ सभासदांना रु. ७४,०७८ कर्जमाफीचा फायदा मिळाला. सुतार-लोहार उद्योगाचा चौथा, वेत बांबू व इतर उद्योगांचा त्या पाठोपाठ अनुक्रमे चौथा, पाचवा व सहावा क्रमांक लागतो. या उद्योगांची अनुक्रमे ४६ सभासदांची रु. ५०,९०२, २३ सभासदांची रु. ७,५७२ व ५ सभासदांची रु. १,७६८ कर्जमाफी झाली.

५) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानात सर्वात जास्त सभासद संख्या वाख उद्योगाची असून ती १८१ आहे तर कमीतकमी सभासद संख्या ५ असून ती इतर उद्योगातील आहे.

६) १९८९-९० या वर्षातील कर्जमाफी अनुदानातील सभासद संख्या पाहिल्यास सरासरी सभासद संख्या ६६ इतकी आहे.

७) १९८९-९० या वर्षातील एकूण कर्जमाफी पाहिल्यास सरासरी कर्जमाफी ही रु. ६२,७८९ इतकी आहे.

५.५ <u>मूल्यमापन</u> :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील अनुदानाचा विचार केल्यास संघास एकूण अनुदान रु. १५,२०,९७५ मिळाले असून हे अनुदान सर्व योजनांच्या साहाय्याने मिळालेले आहे.

२) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील संघास मिळालेल्या अनुदानाची रचना पाहिल्यास सर्वात जास्त अनुदान १९८९-९० या वर्षामध्ये असून ते रु. ५,१९,६७० आहे तर सर्वात कमी अनुदान १९७४-७५ या वर्षातील असून ते फक्त रु.८८०-०० असून ते सरकारी शेअर्स योजनेअंतर्गत आहे.

३) संघास मिळालेल्या अनुदानाचा विचार केल्यास सर्वात जास्त अनुदान खादी ग्रामोद्योग मंडळ योजनानुसार विशेष घटक योजना अंतर्गत असून ते रु. ५,६९,२२५-०० आहे तर सर्वात कमी अनुदान सेवा शुल्क योजने अंतर्गत असून ते रु. २३,६४२-०० आहे.

४) संघाच्या अभ्यासाच्या काळात मिळालेल्या अनुदानात इतर योजनांच्या साहाय्याने मिळालेले एकूण अनुदान रु. ६,८५,६५३ असले तरी ते अनुदान रक्कमेपेक्षा कमी आहे कारण अनुदानाची रक्कम रु. ८,३५,३२२ इतकी आहे.

५) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील संघास मिळालेल्या एकूण अनुदानाची रचना पाहिल्यास सरासरी अनुदान रु. ७६,०४९ इतके आहे. ही सरासरी एकूण अनुदान व वर्षांची संख्या यांचेशी निगडीत आहे.